## बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे मे २०१८

## गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–०२, गुअवि; मुंबई .

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | गुप्रशा;गुरक्र.२८/२०१८ कलम ३०२,२०१,३६४,३६३,३४१,३४ भा.द.वि. (डॉ.दा.भ.मार्ग पोलीस ठाणे गुरक्र. ७८/२०१८), |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक १६/०३/२०१८ रोजी ०१.०० वा.चे |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | भारत नगर, एम.एस.अली रोड, ग्रॅन्टरोड, मुंबई |
| ४ | **फिर्यादी** | श्री. संजीव सोपानराव गुंडेवाड वय ४७ वर्षे, सपोउनिक्र. २०४००/गु.शा. , रा.ठि. ४/४४, ताडदेव पोलीस वसाहत, ताडदेव, मुंबई–३४. |
| ५ | **~~बळीत~~/मयत** | कुमारी किर्ती राजेंद्र व्यास वय २८ वर्षे |
| ६ | **आरोपी अटक** | १) सिध्देश शांताराम ताम्हाणकर वय २८ वर्षे, व<br>२) श्रीमती खुशी अजय सजवानी वय ४२ वर्षे<br>**अटक दिनांक दिनांक ०४/०५/२०१८ रोजी १८.३० वा.** |

डॉ.दा.भ.मार्ग पो.ठाणे, हरविलेली मोठी माणसे नोंद क्रमांक ०६/२०१८ मधील कुमारी किर्ती राजेंद्र व्यास, वय २८ वर्षे या हरविले बाबत श्री राजेन्द्र हर्षल व्यास वय ६८ वर्षे यांनी तक्रार नोंद केली. त्या प्रकरणाची पुढील चौकशी मा. वरिष्ठांचे आदेशान्वये गु.प्र.शा., कक्ष–२, गु.अ.विभाग या कक्ष कार्यालयाकडे देण्यात आली. त्यानुसार गुप्रशा;गुरक्र.२८/२०१८ कलम ३०२,२०१,३६४,३६३,३४१,३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाची थोडक्यात हकिकत अशी की, हरविलेली व्यक्ती कुमारी किर्ती व्यास या अंधेरी (पश्चिम), मुंबई येथील ' बि ब्लंट सलुन ' या कार्यालयात फायनान्स मॅनेजर, अटक आरोपी सिध्देश शांताराम ताम्हाणकर अकाऊंट एक्सीकेटीव्ह व महिला अटक आरोपी श्रीमती खुशी अजय सजवानी ॲकडमी मॅनेजर म्हणुन नोकरी करतात.

दिनांक १६/०३/२०१८ रोजी ०१.०० वा.चे सुमारास भारत नगर, एम.एस.अली रोड, ग्रॅन्टरोड, मुंबई. याठिकाणी यातील आरोपी क्र.१) सिध्देश शांताराम ताम्हाणकर वय २८ वर्षे, व २) श्रीमती खुशी अजय सजवानी वय ४२ वर्षे यांनी घटनास्थळी येवून यातील बळीत किर्ती व्यास यांना फोर्ड इको स्पोर्ट मो/कार क्रमांक MH-02-DG-2289 मध्ये बसवुन ऑफीसला सोडतो असे सांगुन त्यांना वाटेत सोडल्याचे खोटे सांगुन, मो/कारचे न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कालीना, सातांक्रुझ (पुर्व), मुंबई यांचे तपासणीत डिकीत मिळुन आलेल्या रक्ताच्या डागा बरोबर बळीत व्यक्ती कुमारी किर्ती व्यास यांचे आई वडीलांचे रक्ताचे डिएनए बरोबर जुळल्याने त्यांचा नमुद कार मध्ये संगनमताने खुन केला व पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेहाची विल्हेवाट लावली म्हणुन गुन्हे शाखा येथे नेमणुकीस असलेले सपोउनिक्र.२०४००/संजीव सोपानराव गुंडेवाड वय ४७ वर्षे यांनी दिनांक ०४/०५/२०१८ रोजी सरकारतर्फे फिर्याद दिलेवरून डॉ.दा.भ.मार्ग पोलीस ठाणे गुरक्र. ७८/२०१८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणाची चौकशी गुन्हे शाखा येथे वर्ग झाल्यानंतर गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–२ पथकाने दोन्ही आरोपीत इसमांकडे वेगवेगळी चौकशी करुन ते सांगत असलेल्या माहितीची शहनिशा करण्याकरीता रेल्वे स्टेशन, भारतनगर, ग्रॅन्ट रोड ते खार, सांताक्रुज व वडाळा (पुर्व) या परिसरातील एकुण ७० सिसिटिव्ही फुटेज, मोबाईल फोन डिटेल्स प्राप्त करुन त्याची तपासणी सुरु केली. सदर पथकाने हरविलेले व्यक्ती काम करीत असलेल्या कार्यालयातील सर्व सहकारी, नातेवाईक, मित्र परिवार व बॅक व्यवहार या सर्व कोनातुन सखोल व्यापक चौकशी केली. सदर पथकाने केलेल्या चौकशी मध्ये आरोपीत इसम हे सांगत असलेल्या सर्व बाबी जरी जुळून येत असल्या तरी त्यांनी बळीत व्यक्तीस ग्रॅन्टरोड रेल्वे स्टेशनचे जवळ सोडले व रात्रीच्या वेळी फिरण्याकरीता वडाळा (पुर्व) येथील माहुल बिपीटी रोड येथील त्यांची उपस्थिती या दोन मुदयांबाबत समर्पक असे पुष्टी देणारे दुवे मिळुन येत नसल्याने तपासाची सुई वारंवार त्यांचे भोवती फिरत होती. अशातच दोन्ही आरोपीत इसम वारंवार त्यांचे

दोघांमधील प्रेम प्रकरणाचा आधार घेवुन प्रत्येक वेळेस चौकशीत मुळ मुदयांस बगल देवुन पथकाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न करीत होते.

सदर पथकाने प्राप्त मोबाईल CDR चा तसेच इतर तांत्रीक बाबींचा अत्यंत बारकाईने अवलोकन करता, आरोपीत इसम सांगत असलेल्या ठिकाणचे पुढे देखील त्यांचे मो/कार मध्ये बळीत मुलगी उपस्थित असल्याचे आढळुन आली. सदर पथकाने शोध कार्यास उपयुक्त माहिती मिळावी या करीता नमुद दिवशी बळीत मुलीचा वावर असलेली व पथकाने ताब्यात घेतलेली मो/कार क्र. MH-02-DG-2289 ही न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कालीना, मुंबई येथे तपासणीकामी पाठविली. सदरवेळी तज्ञांनी कौशल्यपुर्वक केलेल्या तपासणीत मो/कारचे डिकी मधील मॅटवर एक रक्ताचा डाग मिळुन आला. नमुद रक्ताचे पुढील तपासणीत तज्ञांना डिएनए प्रोफाईल प्राप्त झाला. त्यासोबत बळीत मुलीचे पालकांचे रक्ताची तुलनात्मक तपासणी केली असता मो/कार मध्ये मिळुन आलेला रक्ताचा डाग त्यांचे स्त्रिलींगी अपत्याचा असल्याचे स्पष्ट झाले. तेव्हा वारंवार आरोपीत इसमां भोवती फिरणारे संशयाचे सुईने त्यांनी बळीत मुलीस जिवे ठार मारुन तिचे मृतदेहाची विल्हेवाट लावलेली असल्याचे स्पष्ट होत असल्याने सदर पथकाने त्यांचे विरुध्द नमुदप्रमाणे गुन्हा दाखल केला. सदर पथकाने आ.क्र. १) सिध्देश शांताराम ताम्हाणकर वय २८ वर्षे, व २) श्रीमती खुशी अजय सजवानी वय ४२ वर्षे यांना नमुद गुन्हयात दिनांक ०४/०५/२०१८ रोजी १८.३० वा. रितसर अटक केली.

सदर पथकाने दोनही आरोपीतांकडे सातत्याने कौशल्यपुर्वक तपास केला असता, त्यांनी गुन्हा केल्याची कबुली देवुन बळीत मुलीने दिलेल्या नोटीस मुळे तिला ऑफीसला सोडतो असे सांगुन मो/कार मध्ये घेवुन काही अंतर गेल्यावर रुमालाने गळा आवळुन ठार मारले. त्यानंतर तिचा मृतदेह मो/कार मध्ये आतल्या आतच डिकी मध्ये सरकवुन दिवसभर डिकी मध्येच ठेवला. तसेच नमुद रोजी संध्याकाळचे वेळेस मो/कार मृतदेह बाहेर काढुन वडाळा (पुर्व) परिसरात जावुन शेवटी बिपीटी वडाळा माहुल रोडचे मध्यभागी असलेल्या नाल्याचे मोठा पुलावरुन नाल्यामध्ये तिचे सामानासह सोडुन विल्हेवाट लावल्याचे कबुल केले. त्याप्रमाणे सदर पथकाने आरोपी क्र. १) सिध्देश शांताराम ताम्हाणकर वय २८ वर्षे याचे निवेदन नोंद करून त्याने केलेल्या निवेदनाप्रमाणे प्रत्यक्ष ठिकाणे दाखवुन मृतदेह मो/कार मध्ये डिकीत ठेवल्याचे प्रात्याक्षिक करुन दाखवले.

गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–२ पथकाने कोणताही पुरावा नसताना मानवी कौशल्य, तांत्रिक तपास, सिसिटिव्ही फुटेजद्वारे तसेच न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कालीना, मुंबई यांचेकडुन प्राप्त DNA अहवालानुसार व्यक्ती हरविलेल्याचे नाटक करून उच्चशिक्षीत व उच्चभ्रु वातावरणात वावरणाऱ्या व सतत प्रेमप्रकरणाचा आधार घेवुन खोटे बोलुन दिशाभुल करणाऱ्या व एकाच कार्यालयात नोकरी करणाऱ्या महिलेचा निर्घुण खुन करून तिचा मृतदेह पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेहाची विल्हेवाट लावणाऱ्या दोन आरोपीतांना अटक करून सदरचा गंभीर गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरच्या गंभीर व संवेदनशील गुन्हयाची कौशल्याने उकल केल्याने **मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना मे–२०१८ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोधाचे पारितोषिकाने सन्मानित केले आहे.

**गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष–०२, गुअवि; मुंबई तपास पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार**

| अ.क्र. | अधिकारी/अंमलदार यांची नावे |
|---|---|
| ०१ | प्र.पो.नि. प्रशांत पंढरीनाथ राजे |
| ०२ | स.पो.नि. सचिन सदाशिव माने |
| ०३ | म.स.पो.नि. प्रियंका सुरेश म्हात्रे |
| ०४ | सपोउनिक्र.७८५७/सुनिल पांडुरंग मोरे |
| ०५ | सपोउनिक.२०४००/संजिव सोपानराव गुंडेवाड |
| ०६ | मपोनाक्र.७२०/मानसी महादेव बागलकर |
| ०७ | पोशिक्र.०६.११६८/प्रशांत रावसाहेब थिटमे |